**पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली**
**दिनांक ०५/०१/२०१९**

# वार्तापत्र

## ''<u>सात जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण</u>''

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंठाळुन वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी अदयापर्यंत आत्मसमर्पण केलेले आहे. त्याच बरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण ३१ लाख ५० हजार रुपये बक्षीस असलेल्या ०७ जहाल माओवाद्यांनी मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा., मा. अपर पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री महेंद्र पंडित सा., मा. अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली डॉ. हरी बालाजी सा. आणि मा. अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली डॉ. मोहित गर्ग सा. यांच्या समोर आत्मसमर्पण केले आहे. गडचिरोली पोलीसांनी माओवाद्यांच्या विरोधात आतापर्यंत केलेली उत्कृष्ठ कामगिरी तसेच विकासाच्या विविध योजना राबवुन जनतेचा विश्वास संपादन केल्यामुळे माओवादी मोठया प्रमाणात आत्मसमर्पण करीत असुन खालील ०७ जहाल माओवाद्यांनी पोलीसांसमोर आत्मसमर्पण केले आहे.

१) **<u>विकास उर्फ साधु पोदाळी</u>** हा २७ वर्ष वयाचा माओवादी माहे फरवरी २०१३ मध्ये बिनागुंडा गाव सिएनएम टिम मध्ये सामील होवुन माहे मार्च २०१४ पासुन कोडेलयेर छत्तीसगड जन मिलिशीया दलम मध्ये सदस्य म्हणुन कार्यरत होता. त्याचेवर **०३ चकमकीचे गुन्हे दाखल असुन महाराष्ट्र शासनाने त्याचेवर ४ लाख रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

२) **<u>वैशाली बाबुराव वेलादी</u>** ही १८ वर्ष वयाची माओवादी माहे जानेवारी २०१५ मध्ये राही दलम मध्ये सदस्या म्हणुन भरती होवुन माहे जानेवारी व फरवरी २०१८ मध्ये चातगाव दलम मध्ये राहुन पुन्हा राही दलम मध्ये गेली त्यांनतर माहे ऑगस्ट २०१८ मध्ये भामरागड दलम मध्ये कार्यरत होती. **तिच्यावर महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

३) **<u>सुरज उर्फ आकाश उर्फ धनावू तानु हुर्रा</u>** हा २५ वर्ष वयाचा माओवादी माहे फरवरी २०१० मध्ये टिपागड दलम मध्ये सदस्य पदावर भरती होवून त्यांनतर एप्रील २०११ ते एप्रील २०१३ कालावधीत धानोरा दलम मध्ये आणि माहे मे २०१३ मध्ये पुन्हा टिपागड दलम मध्ये काम करुन सन २०१५ मध्ये सदस्य पदावरुन त्याला पिपीसीएम म्हणुन पदोन्नती देण्यात आली. माहे जानेवारी २०१७ पर्यंत कसनसुर एक्शन टिम मध्ये कार्यरत होता. तसेच माहे फेब्रुवारी २०१७ ला कसनसुर एक्शन टिम मधुन बदलुन माहे ऑगस्ट २०१७ पर्यंत कसनसुर दलम मध्ये पिपीसीएम पदावर कार्यरत होता. त्याच्यावर **१३ चकमकीचे, ०५ खुनाचे, ३ भूसुरूंग**

**स्फोट, 1 जाळपोळ असे गुन्हे दाखल असुन त्याच्यावर महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

४) **<u>मोहन उर्फ दुलसा केसा कोवसी</u>** हा १९ वर्ष वयाचा माओवादी माहे जुन २०१५ ला पेरमीली दलम मध्ये भरती होवुन माहे जुलै २०१५ पर्यंत पेरमीली दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत असतांना माहे ऑगस्ट २०१५ ला पेरमिली दलम मधुन सिरोंचा दलम मध्ये बदली होवुन माहे फेब्रुवारी २०१७ पर्यंत सिरोंचा दलम डिव्हीसी रघु याचा गार्ड म्हणुन कार्यरत होता. माहे मार्च २०१७ डिव्हीसी रघुची सिरोंचा दलम मधुन भामरागड/गट्टा एरियात बदली झाल्याने रघु सोबत गार्ड म्हणुन माहे एप्रिल २०१७ पर्यंत भामरागड दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होता. त्याच्यावर **०२ चकमकीचे गुन्हे, ०१ खुनाचा गुन्हा दाखल असुन त्याच्यावर महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

५**<u>) नविन उर्फ अशोक पेका</u>** हा २५ वर्ष वयाचा माओवादी माहे फेब्रुवारी २०१२ मध्ये गट्टा दलममध्ये भरती होवुन माहे मार्च २०१२ पर्यंत गट्टा दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत राहुत माहे एप्रिल २०१२ मध्ये गट्टा दलम मधुन सिरोंचा दलममध्ये बदली होवुन सन २०१४ पर्यंत सिरोंचा दलममध्ये कार्यरत राहुन डिव्हीसी श्रीनु कसनसुर (चकमकीत मयत) अंगरक्षक_म्हणुन कार्यरत होता. सन २०१४ मध्ये सिरोंचा दलममधुन गट्टा दलममध्ये बदली होवुन सन २०१५ मध्ये उपकमांडर पदावर पदोन्नती होवुन सन २०१७ पर्यंत गट्टा दलम उपकमांडर पदारव कार्यरत होता. माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये गट्टा दलममधुन पेरमीली दलमध्ये बदली होवुन माहे मार्च २०१७ पर्यंत पेरमिली दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होता. माहे एप्रिल २०१७ मध्ये पेरमिली दलममधुन पुन्हा गट्टा दलममध्ये बदली होवुन माहे ऑगस्ट २०१८ पर्यंत सदस्य पदावर कार्यरत होता. त्याच्यावर **०५ चकमक, ०२हमला, ०१ ब्लॉस्ट,०६ खुन, ०१ अपहरण , ०१ हमला, ०२जाळपोळ , असे गुन्हे दाखल असुन त्याच्यावर महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

६) **<u>जन्नी उर्फ कविता हेवडा धुर्वा,</u>** ही २६ वर्ष वयाचा माओवादी माहे जुन २०१० ला भामरागड दलममध्ये भरती होवुन आठ ते दहा दिवस राहुन माहे जुन २०१० पर्यंतंच भामरागड दलमध्ये सदस्य पदावर कार्यरत होता. माहे जुन २०१० ला भामरागड दलममधुन पेरमिली दलममध्ये बदली होवुन माहे डिसेंबर २०१० पर्यंत पेरमिली दलममध्यये सदस्य पदावर कार्यरत होता. माहे डिसेंबर २०१० ला पेरमिली दलममधुन कंपनी क्रमांक ०४ मध्ये बदली होवुन पिपिसिएम पदावर कार्यरत राहुन याच दरम्यान पिपिसिएम पदावर कार्यरत राहुन पिपिसिएम पदावर पदोन्नती होवुन माहे डिसेंबर पर्यंत कंपनी क्रमांक ०४ प्लाटुन क्र. ए सेक्शन उपकमांडर पदावर कार्यरत होती. तिच्यावर **०७ चकमकीचे, ०२ जाळपोळीचे, ०३ खुनाचे, ०१ भूसुरूंग स्फोट असे गुन्हे दाखल असुन तिचेवर महाराष्ट्र शासनाने ५ लाखाचे बक्षीस जाहीर केले होते.**

७) **<u>रत्तो उर्फ जनीला उर्फ दुर्गी गेबा पुंगाटी,</u>** ही २९ वर्ष वयाची माओवादी माहे ऑक्टोंबर २००७ ला भामरागड दलममध्ये सदस्यापदावर भरती होती. माहे ऑगस्ट २०१० ला कंपनी क्र १० ओपन केल्यावर कंपनी क्र १० मध्ये बदली होवुन सन २०१३ ला पदोन्नती होवुन नोव्हेंबर २०१७ पर्यंत पिपिसीएम पदावर कार्यरत होती. माहे डिसेंबर २०१७ ला ती बीमार असुन तीला गट्टा दलममध्ये अपचाराकरीता सोडण्यात आले व त्यानंतर कंपनी १० मधुन टिपागड दलममध्ये पाठविण्यात आले व बदली करण्यात आले. माहे फेब्रुवारी २०१८ ला गट्टा दलममधुन टिपागड दलमध्ये माहे डिसेंबर २०१८ पर्यंत एसिएएम पदावर कार्यरत असतांना दिनांक ०६/१२/२०१८ ला तिम्मन जवेली डे-यावरून दलम सोडुन जन्नी धुर्वा सोबत पोमके कोठी येथे येवुन स्वखुशीने आत्मसमर्पण केले. **तिच्यावर महाराष्ट्र शासनाने ५ लाख रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

आत्मसमर्पीत माओवाद्यांमध्ये ०३ महीला व ०४ पुरूष आहेत. दलम मध्ये काम करतांना दलममध्ये महिलांवर होत असलेल्या अत्याचार तसेच दलम मधील माओवादी हे गावात जावुन अल्पवयीन आदिवासी मुर्लीना पळवुन नेवुन बळजबरीने त्यांना दलममध्ये भरती करत होते. आदिवासींवर होणारे अनन्वयीत अत्याचार व माओवादी नेहमीच स्वत:च्या फायदया साठी जाणुन बुजुन गडचिरोली जिल्हयातील दर्गम व अति दुर्गम भागाचा विकास कामात आडकाठी निर्माण करतात. या सर्व बाबींना कंटाळुन नक्षलवादयांच्या तावडीतून स्वत:ची सुटका करून घेत आपण विकासाच्या मुळ प्रवाहात परत जावु कि नाही. याबाबत सांशकता होती. परंतू पोलीस दलाने निर्माण केलेल्या विश्वासामुळे व महाराष्ट्र शासनाच्या आत्मसमर्पित योजनेमुळे आम्ही आज पोलीसांपुढे आत्मसमर्पण करत असल्याचे या आत्मसमर्पितांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी दलममधील इतर माओवादी यांनी देखील हिंसाचाराचा मार्ग सोडून मुळ प्रवाहात परत यावे व आपणच आपल्या आदिवासी बांधवांवर करत असलेले अनन्वीत अत्याचार थांबवुन आपल्या भागाचा देखील इतर उन्नत समाजाप्रमाणे विकास व्हावा. या दृष्टीने विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी आत्मसमर्पण योजनेचा फायदा घेत विकासाच्या मुळ प्रवाहात यावे याबद्दल आवाहन केले.

पोलीस विभागाने आत्मसमर्पण करण्याचे आवाहन व शासनाची आत्मसमर्पण योजना आणि पोलीस दलाने भुखंड, आर्थिक मदत, रोजगाराची उपलब्धता, नसबंदी रिओपनींग या सारख्या माध्यमातुन आत्मसमर्पीतांचे पुनर्वसन घडवुन आणल्यान मोठया प्रमाणावर माओवादयांनी आत्मसमर्पण केले आहे.

विकास कामांना रोखणा-या माओवाद्यांवर पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास इच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल. असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सो. यांनी केले आहे.


GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा
FORTUNE FAVOURS THE BRAVE